**ठळक बातम्या**

- नीट परीक्षांमधे रचनात्मक सुधारणांकरता राधाकृष्णन आणि नंदन नीलकेणी समित्यांच्या शिफारशींवरचा कृती अहवाल सादर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे एनटीएला निर्देश

- फास्टॅगद्वारे स्थानिक मासिक पास आता देशभरातल्या १२१ टोलनाक्यांवर उपलब्ध

- भारत आणि सिंगापूर दरम्यान मंत्रीस्तरीय गोलमेज परिषदेत सहभागी होण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांसह प्रतिनिधी मंडळ रवाना

- महाराष्ट्रात अधिसूचित आजारांच्या यादीत सर्पदंशाचा समावेश

**आणि**

- क्रिकेटमधे, श्रीलंकेविरुद्धचा गॉल कसोटी सामना भारताने १६५ धावांनी जिंकला

**<><><><><>**

नीट परीक्षांमधे रचनात्मक सुधारणा आवश्यक असून त्याकरता नेमलेल्या राधाकृष्णन आणि नंदन नीलकेणी समित्यांच्या शिफारशींवरचा कृती अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज एनटीए म्हणजे राष्ट्रीय परीक्षा संस्थेला दिले. यासंदर्भात फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडीकल असोसिएशनने दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी न्यायमूर्ती पीएस नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठासमोर सुरु आहे. नीट परीक्षेच्या सुरक्षेसाठी केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती महाअधिवक्ता तुषार महेता यांनी न्यायालयाला दिली. मात्र या प्रवेश परीक्षेत संस्थागत बदल करण्याची शिफारस राधाकृष्णन समितीने केली होती त्याच्याशी न्यायालयाने सहमती दर्शवली.

दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणी नवी दिल्लीत आंदोलन करणाऱ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईच्या चौकशीसाठी सर्वोच्च न्यायालयानं उच्च स्तरीय समिती नियुक्त केली आहे. या समितीत सेवानिवृत्त न्यायाधीश, माजी पोलीस महासंचालक आणि सीबीआयच्या माजी संचालकांसह इतरांचा समावेश आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहना यांच्या पीठानं काल हे आदेश दिले.

**<><><><><>**

एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं ६०० तज्ज्ञांना कार्यमुक्त करून आणि नवीन तज्ज्ञांची नियुक्ती करत आपल्या परीक्षाविषयक गटामध्ये फेरबदल केले आहेत, अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने समाजमाध्यमावर दिली आहे. उत्तरपत्रिका तपासणी अधिक सुरक्षित करण्यासाठी चार-स्तरीय तपासणी प्रणाली लागू केली जाईल. तसंच, NTA पुढील दोन ते तीन आठवड्यांत किमान २५ अधिकाऱ्यांची नव्याने नियुक्ती करणार आहे. याव्यतिरिक्त, NTA ची कार्यालयं स्थलांतरित करुन सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली जाईल. आगामी परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व सुरक्षा आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या निर्देशानुसार NTA ने घेतला आहे.

**<><><><><>**

NHAI अर्थात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने फास्टॅग अंतर्गत स्थानिक मासिक पासची व्याप्ती वाढवली असून आता देशभरातल्या १२१ टोलनाक्यांवर ही सोय उपलब्ध असेल. या ॲपच्या ऑनलाईन सुविधेमुळे पात्र प्रवाशांना राजमार्ग यात्रा या मोबाईल माध्यमातून मासिक पास काढता येईल. त्यामुळे टोल नाक्यांवर जाऊन आवश्यक कागदपत्र प्रत्यक्षपणे सादर करण्याची गरज राहणार नाही. टोल वसुलीच्या कामकाजात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून राष्ट्रीय महामार्गावरचा प्रवास अधिक सुलभ करणं हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**<><><><><>**

भारत आणि सिंगापूर दरम्यान होणाऱ्या दोन दिवसांच्या मंत्रीस्तरीय गोलमेज परिषदेत सहभागी होण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आपल्या शिष्टमंडळासह सिंगापूर इथे दाखल झाल्या. सीतारामन यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल, तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान आणि वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद यांचा समावेश आहे. भारत आणि सिंगापूर यांच्यातील उच्च-स्तरीय आर्थिक सहकार्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ असलेल्या या परिषदेत प्रगत उत्पादन, दळणवळण सुविधा, डिजिटायझेशन, आरोग्य आणि वैद्यकीय क्षेत्र, कौशल्य विकास आणि शाश्वतता या क्षेत्रांमधल्या प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

दरम्यान, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी सिंगापूरचे परराष्ट्र मंत्री विवियन बालकृष्ण यांची भेट घेतली. यानंतर त्यांनी बालकृष्णन यांच्यासोबत सिंगापूरमधल्या भारताच्या उच्चायुक्तालयाच्या नवीन 'चॅन्सेरी' संकुलाची पायाभरणी केली. हे संकुल भारत आणि सिंगापूरच्या सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या नव्या युगाचं प्रतिबिंब ठरेल, असा विश्वास जयशंकर यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

सर्पदंश हा अधिसूचित आजारांच्या यादीत समाविष्ट झाल्याच महाराष्ट्र सरकारने जाहीर केलं आहे. त्यानुसार, राज्यातल्या सर्व रुग्णालयं, वैद्यकीय महाविद्यालयं आणि आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी सर्पदंशाची प्रत्येक संशयित किंवा नोंद झालेली घटना तसंच त्यामुळे होणाऱ्या मृत्युबाबत माहिती देणं अनिवार्य आहे. गडचिरोलीमधल्या जपतलाई गावातल्या आश्रमशाळेत सर्पदंशामुळे झालेल्या तीन विद्यार्थिनींच्या मृत्युच्या पार्श्वभूमीवर सरकारने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे सर्पदंशाच्या घटनांवर देखरेख तसंच उपचार सुनिश्चित करता येतील. विषरोधक औषधांच्या उपलब्धतेचंही नियोजन अधिक चांगल्या प्रकारे करता येईल, असं आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं. सर्पदंशाच्या घटना आणि मृत्यूंशी संबंधित ठिकाण, परिस्थिती आणि ऋतू यांसारख्या घटकांचा अभ्यास करून सरकार स्थानिक पातळीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणार आहे.

<><><><><>

भारत आणि श्रीलंका क्रिकेट संघात गॉल इथे सुरु असलेला कसोटी सामना आज भारतानं जिंकला. सामन्याच्या आजच्या पाचव्या दिवशी श्रीलंकेनं दुसऱ्या डावात सर्व गडी बाद २०६ इतकीच धावसंख्या उभारली.
विजयासाठी श्रीलंकेसमोर एकूण ३७२ धावांचं आव्हान होतं. हा भारतीय संघाचा आंतरराष्ट्रीय पातळीवरचा ६००वा कसोटी सामना होता.

<><><><><>

BWF बॅडमिंटन विश्वचषक मध्ये आज नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर दुसऱ्या फेरीमध्ये भारताच्या ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या जोडीने उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. या जोडीने मकाऊच्या लिओंग इओक चोंग आणि एनजी वेंग ची यांचा २१-११, २१-११ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

तसंच पुरुष दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनेही उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. स्कॉटलंडच्या अलेक्झांडर डन आणि ॲडम प्रिंगल या जोडीने सामन्यातून ऐनवेळी माघार घेतल्याने, सात्विक आणि चिराग यांना प्रत्यक्ष सामना न खेळता उप-उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळालं.

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयाच्या वकील संघटनेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ वकील प्रदीप राय यांची निवड झाली आहे. राय यांना ८२२ मतं मिळाली तर त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी अनुपम लाल दास यांना ४५१ मतं मिळाली.

<><><><><>

झारखंडमधे गैरप्रकारांचे आरोप झालेल्या २२ भरती परीक्षा तिथल्या राज्यशासनाने रद्द केल्या आहेत. तसंच २३ परीक्षांमधे गैरप्रकाराच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. यासंदर्भात काल अधिसूचना जारी करण्यात आली .परीक्षांमध्ये औषध निरीक्षक, सहाय्यक प्राध्यापक, उपजिल्हाधिकारी, दंतवैद्य, सहाय्यक अभियंता आदींच्या भरतीसाठीच्या परीक्षांचा समावेश आहे. JPSC

आणि JSSC मधील या परीक्षा रद्द करण्याच्या मागणीसाठी उपोषण करणाऱ्या आंदोलकांनी काल उपोषण मागे घेतलं. दिलं.

<><><><><>

हॉकी विश्वचषक स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तानचा सामना होणार आहे. भारताने पहिल्या  सामन्यात वेल्सचा पराभव केला होता मात्र दुसऱ्या सामन्यात इंग्लंडसमोर हार  पत्करली. आजच्या सामन्यात विजय मिळवून उपान्त्य फेरीत जाण्याचा भारतीय संघाचा निर्धार असेल.  नेदरलँड्समधे एम्सटेलविन इथं आज भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडेसहा वाजता हा सामना सुरु होईल.

<><><><>

गुजरातच्या भावनगर जिल्ह्यात बनावट दारू प्यायल्यानं ३ जणांचा मृत्यू झाला तर १७ जणांना रुग्णालयात भरती करण्यात आलं आहे. या प्रकरणी ४ जणांना अटक करण्यात आली असल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे.सिरमौर जिल्ह्यातील काफोटो जवळील खाणकाम क्षेत्रात काल दरड कोसळल्यानं तीन मजुरांचा मृत्यू झाला.घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. तसंच सोलन जिल्ह्यात  कोटी भागात दरड कोसळल्यानं शिमला-कालका मार्गावरची रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे.

दरम्यान, हवामान विभागानं आज पूर्व आणि पश्चिम उत्तर प्रदेश, पूर्व मध्य प्रदेश आणि उत्तराखंडमधल्या काही ठिकाणी अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे.

//<><><><><>//